**ई-मेलव्दारे :** *** सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब ***

**जनहिताय सर्वदा**

सत्यमेव जयते


**महाराष्ट्र शासन**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२७९११३३ Email ID :- napu15.mhpds@gov.in


**क्रमांक:** -ससेनि-१३२४/प्र.क्र.४०/ना.पु.१५ **दिनांक :**-११.१२.२०२४.

प्रति,

१) श्री. प्रदिप अशोकराव काळे .

२) श्रीम. प्रतिक्षा विजय पवार

३) श्री. शुभम रुपचंद मेश्राम.

**विषय :-** राज्य सेवा (मुख्य) परिक्षा - २०२२ मधील सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब या पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांनी साक्षांकन नमुना व मुळ प्रमाणपत्र सादर करण्याबाबत...

**संदर्भ :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. १४७७(२)/२०२२/वीस, दि.२५.१०.२०२४.

संदर्भाधीन पत्रान्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयातील सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब या पदावर नियुक्तीसाठी आयोगाने आपली शिफारस शासनास केली आहे.

२. शिफारस यादीतील सर्व ०३ उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला साक्षांकन नमुना संपुर्ण भरुन शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे सादर करण्याच्या सुचना आयोगाने दिलेल्या आहेत. सदर **साक्षांकन नमुना ०२ (मुळ) प्रतीत** व त्यासोबत सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब या पदावरील नियुक्तीसाठी सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-१ प्रमाणे **मुळ प्रमाणपत्र तपासणीकरीता व त्यांच्या सांक्षाकित प्रती (Attested Copies) (२ प्रती)** शासनाकडे सादर करण्यात याव्यात.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे **दि.१३.१२.२०२४** रोजी सकाळी ११.०० ते ३.०० या वेळेत उमेदवाराने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय (विस्तार), दुसरा मजला, मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२. येथे स्वत: उपस्थित राहून शासनास सादर करावीत.

४. उपरोक्त कागदपत्रांच्या (Attested Copies) सांक्षाकित प्रतीऐवजी **स्वंयसाक्षांकित** प्रती (Self Attested Copies) सादर केल्यास सोबतचे प्रपत्र-ब मधील स्वंयघोषणापत्र देखील सोबत भरुन आणावे.

५. शिफारसपात्र ०३ उमेदवारांना असेही कळविण्यात येते की, उमेदवारांनी विहित कालमर्यादेत कागदपत्रे सादर करणे व सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच, उपरोक्त परिच्छेद क्र. १ मधील नमूद क्रमानुसार प्रमाणपत्रे दाखविणे बंधनकारक आहे. विहित कालमर्यादेत कागदपत्रे सादर न करणाऱ्या उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार करता येणार नाही, यादी नोंद घ्यावी.

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2024.12.11 15:04:54 +05'30'

**(पूजा मानकर)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सोबत:-** वरीलप्रमाणे

**प्रत आवश्यक कार्यावाहीस्तव :**

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.

यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब या पदाकरीता शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने सदर विषयांकित पत्र नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यंत्रणेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2024.12.11 15:05:36 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत माहितीस्तव :**

१) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

२) सुरक्षा रक्षक, मंत्रालय, प्रवेशव्दारे.
(यांना विनंती करण्यात येते की, सदर पत्राची प्रत घेऊन येणाऱ्या संबंधित उमेदवारास कार्यालयीन वेळेत ओळखपत्र तपासून मंत्रालयात प्रवेश देण्यात यावे, ही विनंती.)

३) निवडनस्ती, ना.पु.१५.

शासन पत्र क्रमांक: -ससेनि-१३२४/प्र.क्र.४०/ना.पु.१५, दिनांक :-११.१२.२०२४ सोबतचे परिशिष्ट-१

**खालील मुळ प्रमाणपत्रे तपासणीकरीता व त्यांच्या सांक्षाकित प्रती (Attested Copies) (२ प्रती) शासनाकडे सादर करण्यात याव्यात.**

१) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

२) शैक्षणिक अर्हताविषयक पुरावा, पदवी प्रमाणपत्रासह सर्व वर्षाच्या गुणपत्रिका (दि. ११.११.२०२२ रोजीचे किंवा तत्पुर्वीचे)

३) जन्म तारखेचा / वयाचा पुरावा (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र) (दि.०१.०९.२०२२ रोजी विहित वयोमर्यादा)

४) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र.

५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०७.०८.२००१ व दि.०८.०१.२०१८ मधील तरतुदीनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र.

६) अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळून उर्वरित मागासवर्गवारी वर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
(दि. ०१.०४.२०२२ ते दि. ०१.०४.२०२३ या वित्तीय वर्षाचे)

७) अमागास महिलांव्यतिरिक्त अन्य वर्गवारीतील महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
(दि. ०१.०४.२०२२ ते दि. ०१.०४.२०२३ या वित्तीय वर्षाचे)

८) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांचे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र. ३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९ मधील परिशिष्ट- अ नुसार विहित केलेले प्रमाणपत्र.

९) भारतीय नागरिकत्व प्रमाणपत्र Nationality Certificate

१०) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र Domicile Certificate

११) मुख्य परीक्षेच्यावेळी सादर केलेले ओळखपत्र.

POOJA
PRASAD
MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER
PROTECTION DEPARTMENT,
2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e5
2728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1
A5A10E6562F73D65107AD668D006B3B164,
cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2024.12.11 15:06:10 +05'30'

(पूजा मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

***